

# बेटावरले बहाद्दूर

वृंदा लिमये



BVBK-0402927

का.वा. २०२७
१५/३/९४



# बेटावरले बहाद्दर

वृंदा लिमये

म. सं. सं. ठाणें, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
दा. क्र. २०२७ दिनांक १५/३/९४
विषय का.वा. क्र. . . . ....

मुखपृष्ठ, रेखाटन, मांडणी:
साईनाथ रावराणे

BVBK-0402927

अक्षर प्रकाशन

**बेटावरले बहाद्दर**
चि. पार्थ
याच्यासाठी

**प्रथम आवृत्ती**
जानेवारी १९९४
अक्षर प्रकाशन ४

© **वृंदा लिमये**
आशीष २५३,
सायन रोड, मुंबई - २२.

**मुखपृष्ठ, रेखाटने, मांडणी**
साईनाथ रावराणे

**अक्षर जुळणी**
अक्षर कम्युनिकेशन्स

**मुद्रक**
मुद्रक ए-२, २७२, शहा अ‍ॅण्ड नाहर
इंडस्ट्रियल इस्टेट,
लोअर परेल,
मुंबई- ४०००१३.

**प्रकाशक**
अक्षर प्रकाशन,
७-८ पांडुरंग बिल्डिंग,
लेडी जमशेदजी रोड,
माहीम, मुंबई-१६.

**मूल्य - २५ रुपये**



# बेटावरले बहाद्दर

बेटावरले बहाद्दर
बोटीत बसून गेले
खजिना लुटून आणायचे
बेत त्यांनी केले


सातासमुद्रापलीकडे
गाठला त्यांनी पल्ला
आफ्रिकेतल्या रानटी टोळयांवर
केला त्यांनी हल्ला

घनघोर झाले युद्ध त्याची
काय सांगू बात
रानटी टोळयांनी त्यांच्यावरती
सहज केली मात

खजिना कुठला त्यांनी लुटला
काय त्यांचे बळ
बोटीत बसून कसाबसा
काढला त्यांनी पळ

बेटावरले बहाद्दर
अजून मारतात बढाई
पळ काढला तरी म्हणतात
आम्हीच जिंकली लढाई






## मुंगी आणि राक्षस

कुठे चाललीस मुंगीबाई
घाईघाईत भरभर
आडवा आला वाटेवरला
दगड तुला डोंगर

छोटेमोठे अडथळे किती
त्यांना देतेस बगल
अवतीभवती उगवलेले
गवत तुला जंगल

इवले टिवले पाण्याचे हे
मधेच थारोळे
पसरलेले तुला तर ते
केवढे मोठ्ठे तळे

भितेस का ग सांग मला तू
एकेक तुझे साहस
मी तर असणार तुझ्यासमोर
अगडबंब राक्षस



## वारा

वारा निघाला झुळूझुळू
करीत टिवल्याबावल्या
त्याने केल्या गुदगुल्या
कळीला एका इवल्या

वारा निघाला रमतगमत
त्याने घातली शीळ
हिरव्या रानात झुलू लागल्या
सावल्या उत्तावीळ

वारा निघाला जरा भरारा
घेत घेत गिरकी
झोपून उठल्या झाडांची मग
घेतली त्याने फिरकी

वारा निघाला मग सुसाट
धाव धाव धावत
त्याचा सगळा आनंद नव्हता
मनामधे मावत

## एस्किमोंच्या देशात



एस्किमोंच्या देशात
बर्फाचे थर
बर्फाची लादी आणि
बर्फाचे घर

एस्किमोंच्या देशात
बर्फाचे शहर
बर्फाची नदी आणि
बर्फाचे डोंगर

एस्किमोंच्या देशात
बर्फाचे पाणी
बर्फाचे खेळ आणि
बर्फाची गाणी

म्हणतो कसा एस्किमो
लोळत बर्फावर
''कशालाच नाही या
बर्फाची सर!''

# फुलपाखरू



फांदीवरती
फुलाफुलावर
फूलपाखरू
झुलते सुंदर

अवचित कुठल्या
जणू फुलाला
पंखच फुटले
विहरायाला ?

अदृश्य कुणी
परीच भुलवीत
मजेत फिरते
पंखा झुलवीत ?

स्वप्न मनातिल
का वाऱ्यावर
भुरभुरते हे
नयनमनोहर ?

फांदीवरती
फुलाफुलावर
फूलपाखरू
झुलते सुंदर

## दिशावतार



पूर्व दिशा अलंकार
घालून पहाते सर्व
तिला आपल्या रूपाचा
आहे जरा गर्व

पश्चिम भरवते पोपटाला
डाळ पेरू मिरची
त्याला शिकवते शब्द आणि
ऐकते पोपटपंची

उत्तर लावते अंगभर
मंद सुगंधी अत्तर
तिच्याजवळ आहेत त्यातले
प्रकार साठसत्तर

दक्षिण काढते रांगोळी
वेलबुट्टी नक्षी
शंख चक्र गदा पद्म
फूल पान पक्षी



## असे कसे ?

उपास करतात ढेरपोटे
कुणास ठाऊक खरे की खोटे!
बघावे तर पोट त्यांचे
पहिल्यापेक्षा केवढे मोठे!

खुराक खातात काडीपैलवान
शक्तिवर्धक घेतात छान
तरीसुद्धा डुगडुग मान
पहिल्यापेक्षा वाईट ध्यान!

# चित्रकला

चित्रकलेच्या तासाला
म्हणाले आमचे मास्तर
''हवं ते चित्र काढा
पण शक्य तितकं सुंदर''

किती मन लावून
काढलं कागदावर
गणपतीऐवजी पण
निघाला एक वानर





## रंग

सांगू का एक गंमत तुम्हाला
रंगांशी माझी दोस्ती
नेहमीच माझी त्यांच्याशी
चालते दंगामस्ती

उतरवायला बघतो त्यांना
नीट कागदावर
खट्याळ सारे धावून येतात
माझ्याच अंगावर

माझ्यावर हल्ला करणारे हे
मुलखावेगळे मित्र
मूर्तिमंत बनवतात मला
विदूषकी चित्र

दिनांक

# अट्टी बट्टी

अट्टी बट्टी
लागली सुट्टी
आता नुस्ती
दंगामस्ती

पत्ते पिसू
हसू रुसू
छान छान गोष्टी
वाचत बसू

नाही अभ्यास
जबरदस्ती
नाही आता
कटकट नस्ती

घरी दारी
सारा वेळ
नवे नवे
खूप खेळ

अट्टी बट्टी
लागली सुट्टी
आता नुस्ती
दंगामस्ती





## देवबाप्पास पत्र

प्रिय देवबाप्पा, तुला
लिहितो आहे पत्र
पाठवून दे ना तुझ्या घराची
रंगीत छायाचित्रं

कारण आमचे आजोबा म्हणे
आले आहेत तिकडे
गुपित सांगू? पुष्कळ गमती
आहेत त्यांच्याकडे

पत्ते खेळतील, गोष्ट सांगतील
रोज तुला नवी
पण त्यांची खूप खूप
काळजी घ्यायला हवी

कितीतरी श्लोक गाणी
आहेत त्यांना पाठ
लौकर परत पाठव त्यांना
पाहतोय त्यांची वाट




## वावटळ

एक वावटळ, जरा चहाटळ
गाणे गुणगुणत आली
गिर गिर गिर गिर गिरक्या घेत
आभाळात वर गेली

ढग होते वरती खोडकर
त्यांना आयतीच संधी
थेंबांचा फवारा उडवून त्यांनी
भिजवली तिची बिंदी

आपल्याच नादात असलेली
क्षणभर चकित वावटळ
धूळ उधळून अंगावर त्यांच्या
तिने काढला पळ



## तीन शिकारी

तीन शिकारी जंगलात गेले
शिकारीचे जंगी बेत केले

झाडावर बांधले अटकर मचाण
त्याच्यावर बसले सावधान

मध्यरात्र... चिडीचूप
शिकारी जागत गडीगुप

जंगलाचा जणू जहागिरदार
वाघ आला वाघ! होश्शियार

विजेरीचा पडणार झोत लक्कन्
बंदुकीचा ओढणार चाप खटकन्

शिकार साधणार आता झटकन्
तोच आली शिंक फटकन्

वाघ सावध सारे कळून
डोळ्यादेखत गेला पळून

तीन शिकारी जंगलात गेले
हात हलवीत परत आले

## माझी गोष्ट

जेव्हा होतो मी छोटा
वय वर्षे एक
मला आवडे जवळच्या
वस्तूंची फेकाफेक

जेव्हा होतो मी छोटा
वय वर्षे दोन
घरी दारी व्हायचे सदा
लाड माझे कोण

जेव्हा होतो मी छोटा
वय वर्षे तीन
रोज मला हवे असत
खेळ नवनवीन

जेव्हा होतो मी छोटा
वय वर्षे चार
सगळी मला म्हणत ''तू
आहेस बाबा हुशार!''

जेव्हा होतो मी छोटा
वय वर्षे पाच
गोळा करू लागलो मी
गोट्या, रंगीत काच

जेव्हा होतो मी छोटा
वय वर्षे सहा
शाळेतल्या बाई म्हणाल्या कशा
''धिटुकला हा पहा!''


जेव्हा होतो मी छोटा
वय वर्षे सात
जुना पडून एकेक नवा
येऊ लागला दात

जेव्हा होतो मी छोटा
वय वर्षे आठ
किती गाणी कविता आणि
श्लोक मला पाठ



जेव्हा होतो मी छोटा
वय वर्षे नऊ
विचार करू लागलो की
पुढे कोण होऊ?

आता मोठा झालोय मी
वय वर्षे दहा
बाबा म्हणतात, ''उद्याचा हा
अंतराळवीर पहा!''



# आकड्यांचे क्रिकेट

एके दिवशी काय झाले
स्वप्नात सारे आकडे आले

म्हणाला एक
''झकास गुगली
चेंडू फेक!''

म्हणाला दोन
''सलामीला बॅटिंग
करणार कोण?''

म्हणाला तीन
''यष्टिरक्षक
मी होईन''

म्हणाला चार
''ठोकणार आता
मी चौकार''

म्हणाला पाच
दहाकडे बघून
''कप्तान हाच!''







म्हणाला सहा
''आपापल्या जागेवर
उभे तर रहा!''

म्हणाला सात
''फिरकी घ्यायला
शिवशिवतो हात''

म्हणाला आठ
''धावा काढणार
निदान साठ''






म्हणाला नऊ
''आजचा दिवस
मी पंच होऊ?''

म्हणाला दहा
''सणसणीत आमचा
खेळ तर पहा''

ठोकाठोक नि भागंभाग
सुरू झाली तोच
''स्वप्नातून जाग''



## आइस्क्रीम

आइस्क्रीम आइस्क्रीम!
आई, मला आइस्क्रीम!

काडीवरले कपामधले
देशील ते ते प्रकार सगळे

मस्त एकदम गारेगार
जिभेवरती विरघळणार

न दवडता तोंडची वाफ
चाटून पुसून सारे साफ

आइस्क्रीम आइस्क्रीम!
आई, मला आइस्क्रीम!



## क्रिकेट

सुसाट धावली झेल पकडायला
अस्मादिकांची स्वारी
''शाब्बास रे पट्ठे'' झेलण्याचीही
मनामधे तयारी

झाले एवढेच : कपाळावर
टेंगूळ भले मोट्ठे
नाक सुजून भप्प केवढे
खिंकाळले सारे पोट्टे!



## मंत्र

कान धरा
मंत्र स्मरा
जादूचा पक्षी
येईल घरा

तोंड मिटा
मंत्र जपा
स्वप्नात येईल
देवबाप्पा

नाक धरा
मंत्र घोका
चंद्रलोकात
जाईल झोका

डोळे मिटा
मंत्र म्हणा
पऱ्या तुम्हाला
करतील खुणा



## शाळेला जाताना

समोरच्याच कोपऱ्यावरती
डोंबाऱ्याचा खेळ
शाळेला होईल ना उशीर, चला
पाहायला नाही वेळ

वाटेत दिसला आइसफ्रूटवाला
गाडीवरती भेळ
शाळेला होईल ना उशीर, चला
खायला नाही वेळ

बागेत छोट्यांचा रंगात आलाय
घसरगुंडीचा खेळ
शाळेला होईल ना उशीर, मजा
करायला नाही वेळ

फांदीवरती झुलतोय पोपट
मजेत काढून हेल
समोरच वर्गात शिरा आता
शाळेची झाली वेळ



## कोळी आणि माशी



माशीला म्हणाला कोळी
''किती ग तू साधी भोळी
तुझ्याचसाठी केली आहे
मऊसूत पुरणपोळी
विणून ठेवलीय चमकदार
गर्भरेशमी चोळी
तुझ्या स्वागताला सज्ज माझे
घर चंद्रमौळी''

तशी कोळ्याला म्हणाली माशी
''खरोखरच खाशी
स्वागताची तुझी तयारी
आभार तरी मानू कशी ?
पण वेळच नाही रे, ठेव सारे
तुझे तुझ्याचपाशी!''

बाल वाङ्मय विभाग
क्र. 2024 दिनांक 9/3/07
विषय बा.वा.
BVBK-0402927

## या संचातली इतर पुस्तके

**तीन कलंदर बडे बिलंदर**
- वृंदा लिमये
किंमत - २५ रुपये

**चिंकू टिंकू**
- वृंदा लिमये
किंमत - २५ रुपये

**बेटावरले बहाद्दर**
- वृंदा लिमये
किंमत - २५ रुपये

**जंगल जत्रा**
- वृंदा लिमये
किंमत - २५ रुपये

